I0

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** ठाणे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0057 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 08:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 29/03/2023

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/04/2023

**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/04/2023 **Time (वेळ):** 17:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 08:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यलय,शासकीय विश्रामगह कोर्टनाका,ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन मारुती वाघमोडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 4/402,मेराघर सोसायटी ,निघू गाव दहिसर वाकळण रोड,ठाणे,ठाणे नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 4/402,मेराघर सोसायटी ,निघू गाव दहिसर वाकळण रोड,ठाणे,ठाणे नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | वासुदेव बिसन पवार | | | 1. अग्रवाल कॉलेज जवळ, बाबासाहेब आंबेडकर भवन, कल्याण प जि ठाणे ,ठाणे नगर, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी नितीन मारुती वाघमोडे वय 33 वर्षे व्यवसाय . रिक्षा चालक रा फ्लॅट नं 402ए सी विंग चैथा मजला मेराघर सोसायटी निघू गाव दहिसर वाकळण रोड ता ठाणे जि ठाणे फिर्याद लिहून देतो की

माझ्या परिचयाचे श्री हाफीज अब्दुल बारी खान रा नागाव ता व जि ठाणे यांची सामाईक हिस्सेदार श्री गणपत कबळे श्री बशीर बेन्नी व श्रीमती सईदा चैंगुले यांच्या हिस्सेदारीमध्ये नागाव येथे सव्हे नं 228/8/अ क्षेत्र 0.10.10तसेच पोटखराबी 0.00.20 आकारणी कर 1.69 पैसे ही शेतजमीन आहे सदरची शेतजमीन त्यांना विकसीत करायची असल्याने त्याकरीता महसुल विभागाकडून सदरची शेतजमीन अकृशीक जमीनीमध्ये रूपांतरीत करणे आश्यकता आहे श्री खान व इतर हिस्सेदार हे त्यांच्या खाजगी व्यवसायामध्ये व्यस्त असल्याने श्री खान यांनी सदरचे काम करण्याकरीता मला सांगितले होते व तसे अधिकारपत्र दिलेले होते त्याप्रमाणे सदर कामाकरीता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रांस श्री खान व इतर हिस्सेदार यांचा दि11/08/2021 रोजीचा अर्ज मी तहसिलदार कार्यालय ठाणे येथे दि. 01/09/2021 रोजी सादर केला होता

सदरच्या कामाकरीता मी बरायाच वेळा तहसिलदार कार्यालयात जाऊन संबंधीत काम करणा-या महसुल सहायक श्रीमती रूपाली विरकर यांची भेट घेऊन त्यांच्याकडे श्री खान यांच्या कामाबाबत विचारणा केली होती परंतु त्यांनी सदर कामास वेळ लागेल असे सांगितले होते

दि 24/03/2023 रोजी श्री खान यांच्या कामाबाबत चौकशी करण्याकरीता मी तहसिलदार कार्यालय ठाणे येथे गेलो असता श्रीमती विरकर यांची भेट घेतली त्यांनी मला कार्यालयात थांबून राहण्यास सांगितले श्रीमती विरकर यांनी श्री खान यांची फाईल त्यांच्यासोबत काम करणा-या श्रीमती मनिशा यांच्याकडे देऊन मला नायब तहसिलदार वासुदेव पवार यांच्या कक्षामध्ये जाण्यास सांगितले त्यानुसार श्रीमती मनिशा यांच्यासोबत मी वासुदेव पवार नायब तहसिलदार ठाणे यांच्या कक्षामध्ये गेलोण श्रीमती मनिशा यांनी श्री खान यांची फाईल पवार यांच्याकडे दिली व त्यांना मी सदर कामाकरीता आलो असल्याचे सांगून तेथून निघून गेल्या

पवार यांनी माझी ओळख करून घेऊन श्री खान यांचे काम स्वतःकडे आहे अथवा इतर कोणाकडून घेतले आहे याबाबत विचारले मी त्यांना सदरचे काम स्वतः घेतले असल्याचे सांगून त्याबाबत श्री खान यांनी मला अधिकारपत्र लिहून दिले असल्याचे देखील सांगितले त्यानुसार नायब तहसिलदार पवार यांनी श्री खान यांच्या अर्जासोबतची सर्व कागदपत्रे पाहून मला सदर कामाकरीता काहीतरी दयावे लागेल असे सांगितले मी त्यांना काय दयावे लागेल असे विचारले असता पवार यांनी एका कागदावर 1,42,000/- असा आकडा लिहून दाखविला व तो कागद पुन्हा त्यांच्या जवळच ठेवला सदर रक्कमेमध्ये सर्व काम होईल का असे पवार यांना मी विचारले असता त्यांनी सांगितले की अकृशीक कराची आकारणी करण्याकरीता शासकीय फी चलनाद्वारे भरावी लागेल परंतु सदरची परवानगी देण्याकरीता सदरची रक्कम त्यांना दयावी लागेल असे सांगितले

त्यानुसार पवार यांना श्री खान यांच्याशी चर्चा करून कळवितो असे सांगितले पवार यांनी सदरची रक्कम दिल्याशिवाय परवानगी देण्यात येणार नाही असे मला सांगितले त्यानंतर मी सदर कार्यालयातून निघून आलो सदर घटनेवरुन माझ्या लक्षात आले की श्री खान व त्यांचे सामाईक हिस्सेदार यांच्या शेतजमीनीचे अकृशीक जमीनीमध्ये रूपांतर करण्याकरीता तहसिलदार कार्यालय ठाणे येथील नायब तहसिलदार वासुदेव पवार हे रक्कम 1,42,000/- रूपयांची लाचेची मागणी करीत असून मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरुध्द कारवाई होण्याकरीता दि 28/03/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथील पोउपअधी श्री जाधव यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून स्वहस्ताक्षरात तक्रार दिली होती

माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोउपअधी श्रीजाधव यांनी दोन शासकीय पंच साक्षीदारांना पाचारण केले पंचाच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मला दि 29/03/2023 रोजी लोकसेवक वासुदेव पवार यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर लावून पंच 1 श्री काझी यांच्या समवेत तहसिलदार कार्यालय ठाणे कार्यालयात पाठविण्यात आले

पंच श्री शब्बीर काझी यांच्यासह मी तहसिलदार कार्यालय ठाणे येथे जाऊन नायब तहसिलदार वासुदेव पवार यांची त्यांच्या कक्षात भेट घेतली पवार यांना श्री खान यांच्या सव्हे नं 228 च्या प्रकरणाबाबत माहिती सांगितली त्यांच्या कक्षात इतर इसम उपस्थित असल्याने त्यांनी थोडावेळ बाहेर थांबण्यास सांगितले तसेच पंच श्री काझी यांच्याबाबत विचारले असता ते श्री खान यांचे नातेवाईक व त्यांच्या बांधकामावर सुपरवायझर असल्याचे मी त्यांना सांगितले त्यानंतर मी व पंच श्री काझी कक्षामधून बाहेर आलो काहीवेळाने मी व पंच श्री काझी पुन्हा पवार यांच्या कक्षामध्ये गेलो त्यावेळी पवार यांनी पंच श्री काझी यांना बाहेर थांबण्यास सांगून मला एकटयालाच आत थांबण्यास सांगितले व मला काय प्रकरण आहे असे विचारले पंच श्री काझी यांना सोबत पाठविले असल्याचे मी सांगून पंच श्री काझी यांना बाहेर थांबण्यास सांगितले श्री खान यांच्या ऑर्डरबाबत पवार यांच्याकडे विचारणा केली व त्यांनी शुक्रवार दि 24/03/2023 रोजीच्या भेटी दरम्यान लिहून दाखविलेली रक्कम रु 1,42,000/-. बाबत श्री खान यांना सांगितले असता श्री खान यांनी थोडफार कमी करण्यास सांगितले आहे असे पवार यांना सांगितले त्यावेळी पवार यांनी किती सांगितले एक बेचाळीस ना असे मला प्रश्नार्थक विचारून पंच श्री शब्बीर काझी यांच्याबाबत पुन्हा विचारणा करुन त्यांना काय गरज यायची असे बालले पवार यांनी तु पटकन काय करतो हे करायच असे बोलून हाताच्या इषा-याने माझ्याकडे पैशाची मागणी करुन झोन दाखल्याबाबत विचारणा केली पवार यांना श्रीमती रुपाली विरकर यांनी ऑर्डर बनविली का याबाबत माहिती नसल्याचे मी सांगितले असता पवार यांनी तेच असे बोलून रकमेची मागणी करुन रक्कम आणली असे पुन्हा प्रश्नार्थक विचारले माझ्यासोबत आलेले पंच श्री शब्बीर काझी हे श्री हाफिज खान यांच्याकडे जाऊन आणणार असल्याचे पवार यांना मी सांगितले पवार यांनी मला पंच श्री काझी यांना कक्षात बोलविण्यास सांगून त्यांना देखील रकमेबाबत सांगतो असे बालले पवार यांना सदर रकमेत श्रीमती विरकर मॅडम श्री बोडके यांचा देखील हिस्सा असल्याबाबत विचारले त्यास पवार यांनी होकार देऊन चलनाची रक्कम तुम्हाला भरावी लागणार असल्याचे मला सांगितले त्यानंतर पंच श्री काझी यांना मी त्यांच्या शब्बीर या नावाने हाक देऊन कक्षामध्ये बोलावून घेतले पंच श्री काझी कक्षात उपस्थित झाल्यानंतर पवार यांनी पंच श्री काझी यांना इनको बताया है। ओके असे बोलून माझ्याशी रकमेबाबत चर्चा झाल्याचे सांगितले त्यानंतर पंच श्री काझी यांना पुन्हा कक्षाच्या बाहेर थांबण्यास खुणावले व श्रीमती रुपाली विरकर यांना बोलविण्यास सांगितले दरम्यान श्री बोडके व श्री सुनील देखील कक्षात हजर झाले लोकसेवक पवार यांनी मला कधी जाणार कधी येणार याबाबत विचारले मी त्यांना मुंब्याला जाऊन यायला एक तास लागेल असे सांगितले तसेच पवार यांनी मी सदरची रक्कम त्यांच्याकडेच आणून देऊ ना याबाबत विचारले असता त्यांनी रक्कम कक्षात उपस्थित असलेल्या श्री सुनिल यांच्याकडे देण्यास सांगितले त्यानंतर श्रीमती रुपाली विरकर या कक्षात उपस्थित झाल्या पवार यांनी त्यांना माझी ऑर्डर तयार करण्यास सांगितले श्रीमती विरकर यांनी नोटींग तयार करून दिली असल्याचे सांगितले पवार यांनी श्रीमती विरकर यांना कधी दिली याबाबत विचारले असता श्रीमती विरकर यांनी त्या दिवशीच मनिशाने दिली असल्याचे सांगून पुन्हा बघते व नसेल केली तर करायला लावते मला पण महित नसून मनिशाने त्या दिवशी केली असं बोलली आहे असे सांगितले पवार यांनी आर्डर नसेल केली असे त्यांना सांगितले

नमुद पडताळणीमध्ये लोकसेवक पवार यांनी श्री हाफिज खान यांच्या सव्हे नं 228/8/अ येथील शेतजमीनीचे अकृषीक जमीनीमध्ये रूपांतर करण्याकरीता महसुल विभागाकडून देण्यात येणा-या आदेशाकरीता स्वतः करीता व इतर लोकसेवक यांच्याकरीता रूपये 1,42,000/.रकमेची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले तेव्हा माझ्याकडे रूपये 1,42,000/-. रक्कम उपलब्ध नसल्याने सदरची सापळा कारवाई मी रूपये 1,42,000/-. रक्कम उपलब्ध केल्यानंतर करण्याचे ठरविण्यात आले

लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम रूपये 1,42,000/-. उपलब्ध झाल्याने रकमेसह दि 10/04/2023 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालयात हजर झालो त्यानुसार सापळापूर्व कारवाई पूर्ण झाल्यानंतर पवार यांच्या विरूध्द लाचेचा सापळा आजमविण्याचा निर्णय घेण्यात आलाण् पंच 1 श्री काझी यांच्यासह मी डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर लावून अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या रक्कमेसह रूपये1,42,000/- श्री पवार यांची भेट घेण्याकरीता तहसिलदार कार्यालय ठाणे येथे गेलो परंतु पवार अथवा श्री सुनील कार्यालयात आढळून आले नाहीत पवार यांच्याबाबत कार्यालयात उपस्थित असलेले श्री बोडके यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी पवार यांची बदली झाली असल्याचे सांगून मला श्रीमती विरकर यांच्याकडे घेऊन गेले श्रीमती विरकर यांनी सही झाली का असे विचारले असता श्री बोडके यांनी माहिती नसल्याचे सांगितले श्रीमती विरकर यांनी मला पार्टीचे नाव विचारले असता मी त्यांना श्री खान यांचे नाव सांगितले त्यानंतर श्रीमती विरकर यांनी पवार यांच्याशी बोलून घेते असे सांगून मला साडे तीन वाजता पुन्हा कार्यालयात येण्यास सांगितले त्यामुळे मी व पंच श्री काझी कार्यालयातून निघून आलो

दरम्यान श्री सुनिल याने मला फोन करून तहसिलदार कार्यालयात गेला होता का याबाबत फोनकरून विचारणा

केली मी त्यास होकार देऊन ऑर्डरबाबत विचारले असता त्याने ऑर्डर तहसिलदार कार्यालयात भेटेल असे मला सांगितले
काहीवेळानंतर पुन्हा पंच श्री काझी यांच्या सोबत तहसिलदार कार्यालयात जाऊन श्रीमती विरकर यांची भेट घेतली असता श्रीमती विरकर यांनी मला पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात भेटण्यास बोलविले असून पवार यांना फोन करण्यास सांगितले माझ्याकडे पवार यांचा फोन नंबर नसल्याने श्री बोडके यांनी मला नंबर दिला त्यानंतर मी व पंच श्री काझी तहसिलदार कार्यालयातून बाहेर निघून आलो
पवार यांच्या मोबाईलवर मी संपर्क साधला असता त्यांनी मला जिल्हाधिकारी कार्यालयातील तळमजल्यावरील मुख्यमंत्री कक्षामध्ये बोलाविले त्यानुसार मी व पंच श्री काझी जिल्हाधिकारी ठाणे कार्यालयातील तळमजल्यावरील मुख्यमंत्री कक्षात जाऊन पवार यांची भेट घेतली पवार यांच्याशी श्री खान यांच्या प्रकरणाबाबत चर्चा करून ऑर्डरबाबत चौकशी केली असता त्यांनी ऑर्डर आज संध्याकाळी किंवा उदया भेटेल असे सांगितले त्यानंतर पवार यांनी मला रक्कमेबाबत विचारले असता मी बॅग उघडण्याचा प्रयत्न केला त्यावेळी पवार यांनी पंच श्री काझी यांना बाहेर थांबण्यास सांगून त्यांच्याबाबत माझ्याकडे चौकशी केली पवार यांना श्री काझी हे श्री खान यांचे रिलेटीव्ह असल्याचे सांगितले पंच श्री काझी बाहेर गेल्यानंतर पवार यांनी इथे नको बाहेर जाऊ असे बोलून मला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर घेऊन आले व बाजूस असलेल्या शासकीय विश्रामगृहाच्या आवारात आले दरम्यान पंच श्री काझी आमच्या मागोमग चालत येत होते पवार यांनी पंच श्री काझी यांना थांबून राहण्यास सांगून शासकीय विश्रामगृहाच्या आवारातील वाहन क्रमांक MH 05 CM 8444 च्या ड्रायवर सिटवर बसले व मला मागील सिटवर बसण्यास सांगितले त्यानुसार मी सदर वाहनाच्या मागील सिटवर बसलो त्यावेळी पवार यांनी एक बेचाळीस आहेत असे खात्री करण्यासाठी माझ्याकडे विचारणा करून लाचेच्या रक्कमेची मागणी केली त्यानुसार मी माझ्या बॅगेमधील अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम 1,42,000/-. रूपये माझ्या उजव्या हाताने बाहेर काढून पवार यांच्या समक्ष धरले असता त्यांनी ते पाकीटामध्ये देण्यास सांगितले परंतु माझ्याकडे पाकिट नसल्याचे मी सांगितल्यानंतर पवार यांनी वाहनातील एक सफेद कपडा त्यांच्या दोन्ही तळहातावर धरला व मला लाचेची रक्कम त्यामध्ये टाकण्यास सांगितले त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रूपये 1,42,000/-. त्यांच्या हातावरील कापडामध्ये टाकली त्यानंतर पवार यांनी सदर रक्कम त्या कापडामध्ये गुंडाळून मला मागील सिटवर ठेवण्यास सांगितली त्यानुसार मी सदर रक्कम असलेला कपडा माझ्या बाजूस ठेवला व त्यांना रक्कम मोजून घेण्यास सांगितले पवार यांनी त्यास नकार दिला त्यानंतर मी व पवार वाहनातून बाहेर आलो त्यावेळी शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात हजर असलेल्या सापळा पथकास पवार यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत मी पूर्व नियोजीत इशारा केल्यावरुन सापळा पथकाने लोकसेवक पवार यांना 16:30 वाजता रंगेहात पकडले सदरची रक्कम त्यांच्या वाहनाच्या मागील सिटवरील सफेद रंगाच्या कापडामधून हस्तगत करण्यात आलेली आहे सापळापुर्व कारवाई दरम्यान लिहिलेल्या नोंटाचे क्रमांक व हस्तगत लाच रक्कमेतील नोटांचे क्रमांक पडताळले असता ते जुळून आलेण् अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीमध्ये लाचेच्या नोटांवर तसेच पवार यांनी रक्कम स्विकारण्याकरीता वापरलेल्या कपडयावर अँन्थ्रासीन पावडचे गुणधर्म आढळून आले तसेच पवार यांच्या खाजगी वाहनाच्या मागील सिटवर अँन्थ्रासीन पावडर चकाकताना दिसून आली आहे
अशा प्रकारे लोकसेवक वासुदेव बिसन पवार वय 57 वर्षे तत्कालीन निवासी नायब तहसिलदार तहसिलदार कार्यालय ठाणे सध्या नायब तहसिलदार सेतूद्ध जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे (वर्ग 2) रा डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन पाचवा मजला रूम नं 504 अग्रवाल कॉलेज जवळ गांधारी कल्याण प जि ठाणे मुळ रा. मु पो धरणगाव ता धरणगाव जि जळगाव यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून श्री हाफीज खान व इतर यांच्या मालकीच्या शेतजमीनीचे अकृशीक जमीनीमध्ये रूपांतर करण्याकरीता माझ्याकडे दि 24/03/2023 रोजी रूपये 1,42,000/- व दि 29/03/2023 रोजी पंचांसमक्ष पडताळणी दरम्यान स्वतः करीता व इतर लोकसेवक यांच्याकरीता माझ्याकडे रूपये 1,42,000/-लाचेच्या रकमेची मागणी करून दि 10/04/2023 रोजी 16:30 वा शासकीय विश्रामगृह कोर्ट नाका ठाणे आवारातील त्यांच्या खाजगीवाहनामध्ये माझ्याकडून रूपये 1,42,000/-. लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्विकारली सदरची रक्कम पंचांसमक्ष हस्तगत करण्यात आलेली आहे म्हणून लोकसेवक वासुदेव बिसन पवार यांच्या विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

सदर गुन्हयाचा तपास पो.उप.अधि प्रमोद जाधव, ACB, ठाणे हे करत आहेत. **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

AMIT SUBHASH TAKAVALE

**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)**

**Name (नाव):** JAYRAJ NARSINGRAC

**Rank(पद):** I(Inspector)

**No.(सं.):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अंधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**